ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)**

(Established by Government of Maharashtra in the year 1989)

# व्यवस्थापन मंडळ बैठक

## Board of Management Meeting

## कार्यवृत्त

### Minutes of Meeting

**बैठक क्रमांक** : 205
(Meeting Number)

**स्थळ(Venue)** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२
Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक** : मंगळवार, दिनांक 30 डिसेंबर 2025
**(Day and Date )** : Tuesday, 30 December 2025

**वेळ** (Time) : सकाळी 11.30 वाजता (11.30 am)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगा घरोघरी

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

---

## 205 वी व्यवस्थापन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 205 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने मंगळवार, दिनांक 30 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 11.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | अध्यक्ष |
| 02 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | सदस्य |
| 03 | मा. श्री. प्रसेनजित श्रीकृष्णा फडणवीस, पुणे | सदस्य |
| 04 | मा. डॉ. दत्तात्रय मनोहर गुजराथी, नाशिक | सदस्य |
| 05 | मा. डॉ. संजीवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | सदस्य |
| 06 | मा. डॉ. संजय भावे, मा. कुलगुरू बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | सदस्य<br>ऑनलाईन उपस्थित |
| 07 | मा. प्रा. वाल्मिक सरवदे, प्र-कुलगुरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजी नगर | सदस्य<br>ऑनलाईन उपस्थित |
| 08 | मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण यांचे प्रतिनिधी<br>श्री. अनिल गावित नाशिक | सदस्य<br>ऑनलाईन उपस्थित |
| 09 | मा. प्रा. एन. के. दास, स्कूल ऑफ एज्युकेशन, इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिवर्सिटी, नवी दिल्ली | सदस्य<br>ऑनलाईन उपस्थित |
| 10 | मा. श्री. नरेंद्र जोशी, अंबेजोगाई | सदस्य<br>ऑनलाईन उपस्थित |
| 11 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | निमंत्रित सदस्य |
| 12 | मा. डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त अधिकारी आणि<br>प्र-कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | सदस्य सचिव |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. सचिव, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 02 | मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 03 | मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 04 | मा. संचालक, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 05 | मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 06 | डॉ. अक्षया निकुंभ, मुंबई | सदस्य |

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

## व्यवस्थापन मंडळ बैठक
## Board of Management Meeting
## कार्यवृत्त (Minutes of the Meeting)

मंगळवार, दिनांक 30 डिसेंबर 2025 | वेळ – सकाळी 11.30 वाजता
Tuesday, 30 December 2025 | Time : 11.30 am

| अनु.क्रमांक<br>Subject No. | | तपशील<br>Details |
|---|---|---|
| 205.1 | | **स्वागत**<br>मा. व्यवस्थापन मंडळाचे सचिव यांनी ऑफलाईन तसेच ऑनलाईन पद्धतीने उपस्थित सर्व सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. |
| | | मा. कुलगुरूंनी विद्यापीठाच्या वाटचालीबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करून दिले.<br><br>1. राष्ट्रीय पुस्तक न्यासद्वारे पुणे येथे झालेल्या 'पुणे बूक फेस्टिवल'मध्ये भगवान बिरसा मुंडा आदिवासी संस्कृती वारसा दालन (Tribal Cultural Heritage) मध्ये भारतीय आदिवासी भाषेतील भाषा व संस्कृती यांची माहिती सांगणारे 2600 पेक्षा जास्त पोस्टर्स प्रदर्शित केले होते त्यापैकी 1678 पोस्टर्सची गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या टिमने दखल घेऊन प्रदर्शनात मांडण्यात आले. हे प्रदर्शन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि RISC Foundation All India द्वारे दि. 12 डिसेंबर 2025 रोजी प्रदर्शित करण्यात आले होते. एकाच जागी भाषा व संस्कृतीचा विश्वविक्रम 'गिनीज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये नोंद घेण्यात आली.<br><br>2. परीक्षा नियंत्रकांनी विद्यापीठाच्या जानेवारी 2026 पासून सुरू होणाऱ्या परीक्षांबाबत माहिती देऊन अवगत करून दिले. विविध शिक्षणक्रमांसाठी 80 परीक्षा केंद्रांवर परीक्षांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याची संपूर्ण तयारी परीक्षा विभागाकडून पूर्ण करण्यात आली आहे. दि. 15 जानेवारी 2026 रोजी महानगरपालिकेच्या निवडणूका असल्याने त्या तारखांचे पेपर पुढे ढकलण्यात आले आहेत.<br><br>3. मा. कुलगुरूंनी 4 फेब्रुवारी 2026 रोजी होणाऱ्या पदवीदान समारंभासाठी सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करून दिले तसेच पदवीदान समारंभासाठी उपस्थित रहाण्याचे निमंत्रण दिले. |

| | | |
|---|---|---|
| | | विद्यापीठाने वरीलप्रमाणे गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचा विश्वविक्रम केल्यामुळे विद्यापीठ जागतिक स्तरावर सक्षमपणे वाटचाल करत असल्याचे दिसून येते. यासाठी आदरनिय कुलगुरू प्रो. संजीव सोनवणे यांचे अभिनंदन केले. |
| 205.2 | 205.2.1 | **दिनांक 16 ऑक्टोबर 2025 रोजी झालेल्या 204 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.**<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विषय पत्रिकेत व्यवस्थापन मंडळ सभेचा क्रमांक 204 ऐवजी 205 असा उल्लेख करण्यात आला होता. विषयपत्रिका तयार करताना नजरचुकीने ही चूक झाली. चूक निदर्शनास आणल्यानंतर दिलगिरी व्यक्त करून चूक दुरुस्त करण्यात आली आहे. दिनांक 16 ऑक्टोबर 2025 रोजी झालेल्या 204 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त सचिव यांनी वाचून अवगत करून दिले. त्यानुसार कार्यवृत्त कायम करण्यात आले. |
| | 205.2.2 | **दिनांक 16 ऑक्टोबर 2025 रोजी झालेल्या 204 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल**<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विषयपत्रिकेत व्यवस्थापन मंडळ सभेचा क्रमांक 204 ऐवजी 203 असा उल्लेख करण्यात आला होता. विषयपत्रिका तयार करताना नजरचुकीने ही चूक झाली. चूक निदर्शनास आणल्यानंतर दिलगिरी व्यक्त करून चूक दुरुस्त करण्यात आली आहे. दिनांक 16 ऑक्टोबर 2025 रोजी झालेल्या 204 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल सचिवांनी वाचून सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करून दिला. कार्यवाहीच्या अहवालास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| 205.3 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 205.3.1<br>वित्त विभाग | **वित्त समितीच्या नामनिर्देशनाबाबत...**<br>**टिपणी** - विद्यापीठाच्या वित्त समितीमध्ये विद्यापीठ परिनियम क्रमांक 1 (1 of 1991) (see Section 19 of the Act) Clause 3 मधील (iv) अन्वये Two members nominated by the Board of Management who shall be experts either in industry or in Autonomous Institution or in University or in Government नुसार नाशिक मधील सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, सामनगाव रोड नाशिक यांची मुदत संपुष्टात आल्याने, सदर पद रिक्त झाले आहे.<br>या परिनियमानुसार विद्यापीठ या क्षेत्रातून डॉ. वाणी लातूरकर यांचे नियुक्ती केलेली आहे. तरी उर्वरित क्षेत्रांतून एक नामनिर्देशित करणेसाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठाच्या वित्त समितीमध्ये विद्यापीठ परिनियम क्रमांक 1 (1 of 1991) (see Section 19 of the Act) Clause 3 मधील (iv) अन्वये Two members |

| | | |
|---|---|---|
| | | nominated by the Board of Management who shall be experts either in industry or in Autonomous Institution or in University or in Government नुसार वित्त समितीचे सदस्य म्हणून उद्योग क्षेत्रातून श्री. प्रसेनजित फडणवीस यांचे नामनिर्देशन केले आहे. त्याबद्दल श्री. फडणवीस सरांचे सर्व सन्माननीय सदस्यांनी अभिनंदन केले. त्यांच्या अनुभवाचा वित्त समितीला नक्कीच उपयोग होईल असे मत व्यक्त करण्यात आले. |
| | 205.3.2<br>परीक्षा<br>विभाग | **उत्तरपुस्तिका फोटोकॉपी व पुनर्मूल्यांकन कार्यपद्धती अध्यादेश मसुदा मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेसाठी सादर...**<br>**टिपणी** — परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना उत्तरपुस्तिकांच्या छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकन करण्याच्या कार्यपद्धती करिता<br>1) मा. परीक्षा मंडळ ठराव क्र. 44.4.04 नुसार तयार करण्यात आलेले सूचना पत्र जा.क्र. एचएक्स-23/2023/1231 दि. 18.05.2023<br>2) परीक्षा मंडळ ठराव क्र. 57.4.8<br>3) मा. वित्त समिती बैठक क्र. 24-2025-26 दि. 15.10.2025<br>4) मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र. 204.3.6 या मान्यतेच्या आधारे अध्यादेशाचा मसूदा तयार करण्यात आलेला आहे.<br>सदर अध्यादेशाच्या मसुदा दि. 09 डिसेंबर 2025 रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र. 58.4.03 अन्वये सादर करण्यात केला असता, सदर मसुद्यास परीक्षा मंडळाने मान्यता दिलेली असून सदर अध्यादेशाचा मसूदा मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर....<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - परीक्षा मंडळाने ठराव क्रमांक 58.4.03 नुसार शिफारस केलेल्या अध्यादेशाच्या मसुद्यास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. |
| | 205.3.3<br>परीक्षा<br>विभाग | **परीक्षा विभागातील अभिलेखे जतन करण्याचा कालावधी निश्चित करणेसंदर्भात परीक्षा मंडळाने केलेली शिफारस मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर ...**<br>**टिपणी** — परीक्षा विभागातील अभिलेखे जतन करण्याचा कालावधी निश्चित करणेसंदर्भात मा. प्र-कुलगुरू महोदय यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने केलेली नियमावली दि. 10 डिसेंबर 2025 रोजी आयोजित परीक्षा मंडळासमोर सादर केली होती. परीक्षा विभागातील अभिलेखे जतन करण्याचा कालावधी निश्चित करण्यासंदर्भात परीक्षा मंडळाने केलेली शिफारस मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - परीक्षा विभागातील अभिलेखे जतन करण्याबाबत परीक्षा मंडळाने ठराव क्रमांक 57.4.01 नुसार मा. प्र-कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने अंतिम केलेल्या कालावधीच्या तपशीलास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 205.3.4<br>नियोजन<br>अधिकारी | **विद्यापीठाचा 35 वा वार्षिक अहवाल (2024-25) मा. व्यवस्थापन मंडळासमोर कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...**<br><br>**टिपणी** — विद्यापीठाचा 35 वा वार्षिक अहवाल (2024-25) तयार करण्यात आला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | सदर अहवाल प्रसिद्ध करण्यास मा. कुलगुरू तथा अध्यक्ष, व्यवस्थापन मंडळ सदस्य यांनी मान्यता दिलेली आहे. सदरचा अहवाल कार्योत्तर मान्यतेस्तव मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठाचा 35 वा वार्षिक अहवाल (2024-25) तयार करण्यात आला आहे. सदर अहवाल प्रसिद्ध करण्यास मा. कुलगुरू तथा अध्यक्ष, व्यवस्थापन मंडळ सदस्य यांनी मान्यता दिलेली आहे. सदरच्या अहवालास सर्वानुमते कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 205.3.5<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठातील गट-अ व गट-ब मधील नियमित पदोन्नती तसेच सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला लाभ देण्याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या सभेपुढे मान्यतेसाठी सादर...**<br>**टिपणी** — मा. कुलगुरू महोदयांनी विद्यापीठातील गट-अ व गट-ब मधील नियमित पदोन्नती तसेच सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला लाभ देँण्याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या सभेपुढे मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — मा. कुलगुरू महोदयांनी विद्यापीठातील गट-अ व गट-ब मधील नियमित पदोन्नती तसेच सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला लाभ देण्यासाठी पदोन्नती समिती गठीत केली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल सादर केला. सदरचा अहवाल स्विकारण्यात आला.<br>अ) अहवालातील प्रस्तावात समितीच्या शिफारशींनुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना द्यावयाच्या पदोन्नती समितीच्या निर्णयाच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.<br>आ) श्री. किरण हिरे, कनिष्ठ अभियंता यांना S-15 पे मेट्रीक्स — 41800-132300 या वेतनश्रेणीत सेवांतर्गत आश्वासित योजनेअंतर्गत पहिला लाभ दिनांक 21.10.2025 पासून अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 205.3.6<br>आस्थापना कक्ष | **सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबतचा निर्णय घेण्याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या सभेपुढे मान्यतेसाठी सादर...**<br>**टिपणी** — वरिष्ठ सहायक संवर्गाच्या पदोन्नतीसाठी अपात्र ठरलेल्या सहायक संवर्गाच्या कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबतचा निर्णय घेण्याकरिता मा. कुलगुरू महोदयांनी गठित केलेल्या समितीचा अहवाल मा. कुलगुरूंच्या मान्यतेस्तव व स्वीकृतीकरिता दि. 18.12.2025 रोजी सादर करण्यात आला होता. सदर अहवालास मा. कुलगुरू महोदयांनी स्वीकृती प्रदान केलेली आहे. सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर....<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** — वरीष्ठ सहायक संवर्गाच्या पदोन्नतीसाठी अपात्र ठरलेल्या सहायक संवर्गाच्या 4 कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा |

| | | |
|---|---|---|
| | | लाभ काढून घेण्यात यावा किंवा कसे याबाबत निर्णय घेण्यासाठी मा. कुलगुरू महोदयांनी गठीत केलेल्या समितीचा अहवाल मा. कुलगुरूंनी स्वीकारला आहे. अहवालाच्या अनुषंगाने<br>1. 'शैक्षणिक अर्हतेमुळे वरीष्ठ सहायक पदाच्या पदोन्नतीसाठी अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांबाबत खातेअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ काढून घेऊ नये' यास मान्यता प्रदान करण्यात आली.<br>2. तसेच 'आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करेपर्यंत या कर्मचाऱ्यांचा पदोन्नती निवड सुचीत समावेश करू नये' या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 205.3.7<br>आस्थापना कक्ष | **सन 2026 या वर्षासाठी विद्यापीठ कर्मचाऱ्यांना सुट्या लागू करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** — शासनाच्या दिनांक 05.12.2025 रोजीच्या अधिसूचनेनुसार सन 2026 या वर्षासाठी शासकीय कर्मचाऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेल्या सुट्ट्या तसेच अतिरिक्त सुट्टी विद्यापीठास आणि विद्यापीठांतर्गत सर्व विभागीय केंद्रांना लागू करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - शासनाच्या दिनांक 05.12.2025 रोजीच्या अधिसूचनेनुसार सन 2026 या वर्षासाठी शासकीय कर्मचाऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेल्या सुट्ट्या तसेच अतिरिक्त सुट्टी विद्यापीठास आणि विद्यापीठांतर्गत सर्व विभागीय केंद्रांना लागू करण्यास सर्व सन्माननीय सदस्यांकडून मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 205.3.8<br>वित्त विभाग | **दि. 26 डिसेंबर 2025 रोजी आयोजित वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** : दि. 26 डिसेंबर 2025 रोजी वित्त समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दि. 26 डिसेंबर, 2025 रोजी झालेल्या वित्त समिती बैठक क्र. 25-2025-26 च्या इतिवृत्तावर मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चे बैठकीत पुढीलप्रमाणे विषयांना मान्यता प्रदान करण्यात आली.<br>01 वित्त समिती बैठकीच्या इतिवृत्तातील विषय क्र. 01 ते 03, विषय क्र. 08 ते 12, विषय क्र. 15 ते 17, 20, 21 आणि 24 तसेच ऐनवेळचे विषय क्र. 01 ते 08 ह्या विषयास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.<br>02 वित्त समिती बैठकीतील विषय क्र. 04 ते 06 बाबतीत बांधकाम समिती बैठक क्र. 185, 186, 187 ह्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय सदर बैठकीत बांधकाम विभागाने सादर केलेली तांत्रिक माहिती त्या-त्या बांधकामाच्या संदर्भाने असलेल्या सन्माननीय सदस्यांनी तांत्रिक व स्थापत्तीय दृष्ट्या संपुर्ण जबाबदारीने तपासली असल्याचे संबंधीत विभागाने बांधकाम समिती बैठकीत प्रस्तावित केले. व त्यानुसार त्यांनी अंतिम केलेले इतिवृत्त वित्त समिती व मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत संबंधीत विभागाच्या जबाबदारीवर सर्वानुमते सदर विषयांना मान्यता प्रदान करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | | 03 वित्त समिती बैठकीतील विषय क्र. 18 : बांधकाम विभागामार्फत विद्यापीठात विविध ठिकाणी सी. सी. टीव्ही कॅमेरे बसविण्यास व कन्ट्रोल रुम करिती डिजिटल इन्फ्रास्ट्रक्टरसाठी विहित पध्दतीचा अवलंब करून करण्यास व त्यासाठी रुपये तीन कोटी इतकी तरतुद करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली.<br>04 वित्त समिती बैठकीतील विषय क्र. 19 : विद्यापीठ परीसरातून ऑनलाईन कोर्सेस सुरू करण्यासाठी पुरेसे डिजिटल नेटवर्क व इन्फ्रास्ट्रक्टर निर्माण करण्यासाठी व त्यानुषंगाने येणाऱ्या खर्चाकरिता रूपये आठ कोटी इतकी तरतुद करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.<br>05 वित्त समिती बैठकीतील विषय क्र. 22 : विद्यापीठात येणारे टपाल त्याचप्रमाणे इतर कामकाजासाठी असणारी ई-ऑफीस प्रणाली Document Management System / ई-गव्हर्नन्स सुरू करण्यासाठी ई-निविदा / GeM पोर्टल द्वारे कार्यवाही खरेदी कक्षामार्फत करण्यास व त्यासाठी तुर्त रुपये एक कोटीची तरतुद करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.<br>06 वित्त समिती बैठकीतील विषय क्र. 23 : विद्यापीठाच्या विविध परीक्षा केंद्रांवर ई-सर्व्हलन्स करिता विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षा ह्या संवेदनशील व अतिसंवेदनशील केंद्रावर सी. सी. टीव्ही फॅसिलिटी प्रायोगिक तत्वावर लागु करणेकरिता सी. सी. टिव्ही कॅमेरे बसविण्याबाबत वित्त समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार प्रायोगिक तत्वावर प्रत्येक जिल्ह्यात दोन परीक्षा केंद्रावर सी. सी. टिव्ही कॅमेरे बसविण्यास व त्यानुषंगाने तुर्त रुपये दोन कोटीची आर्थिक तरतुद करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.<br>07 वित्त समिती बैठकीतील कार्योत्तर मान्यतेचे विषय क्र. 01 ते 03 विषयास सर्वानुमते कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात आली.<br>08 वित्त समिती बैठकीतील मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यते आलेले विषय क्र. 01 ते 08 ह्या विषयास मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 205.3.9<br>सभा व दप्तर कक्ष | **दि. 29 डिसेंबर 2025 रोजी आयोजित नियोजन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br><br>**टिपणी** – दि. 29 डिसेंबर 2025 रोजी आयोजित नियोजन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – दि. 29 डिसेंबर 2025 रोजी आयोजित नियोजन मंडळ बैठकीच्या कार्यवृत्तास सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्यता प्रदान केली. तसेच नियोजन मंडळात सादर करण्यात आलेल्या 'Strategic Roadmap for Transforming YCMOU (Period 2025 to 2030): Recommendations for Futuristic Transformation' अहवालाचा आशय, नवीन संकल्पना व व्याप्ती मा. कुलगुरूंनी सर्व सन्माननीय सदस्यांना |

| | | |
|---|---|---|
| | | अवगत करून दिले. त्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांनी मा. कुलगुरू आणि सदस्यांचे अभिनंदन केले. तसेच या अहवालाची प्रत सर्व सन्माननीय सदस्यांना अवलोकन तथा काही सुचना असल्यास त्या सुचनांकरिता पाठविण्याचे निर्देश देण्यात आले. आलेल्या सुचनांचा समावेश करून मा. कुलगुरू यांच्या अंतिम मान्यतेने शैक्षणिक बृहत आराखडा शासनाकडे पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 205.3.10<br>नियोजन अधिकारी | **विद्यापीठाचा दशवार्षिक विकास आराखडा 2025-35 आणि विद्यापीठ विकास आराखडा (Institutional Development Plan) या दोन अहवाल मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर करणेबाबत...**<br><br>**टिपणी** - विद्यापीठाचा दशवार्षिक विकास आराखडा 2025-35 आणि विद्यापीठ विकास आराखडा (Institutional Development Plan) या दोन अहवालांना नियोजन मंडळाच्या दिनांक 29/07/2025 आणि 11/08/2025 च्या बैठकीत मान्यता मिळालेली आहे. सदर अहवाल मा. व्यवस्थापन मंडळाच्या आगामी सभेपुढे सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठाचा दशवार्षिक विकास आराखड्यास मा. नियोजन मंडळाने जरी मान्यता दिली असली तरी हा आराखडा मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना अवलोकन व मार्गदर्शनार्थ पाठवावा. अभ्यासपूर्ण मार्गदर्शनानंतर अहवाल पुढील बैठकीत मान्यतेसाठी सादर करावा असे निर्देश करण्यात आले. |
| | 205.3.11<br>सेवा सुविधा कक्ष | **विद्यापीठाचे यश स्मार्ट आयडी कार्ड, गुणपत्रके, प्रमाणपत्रे व टपालाने विद्यार्थ्यांना पाठविण्याचे अन्य साहित्य इ. साठी भारतीय डाक विभाग यांचेबरोबर करार करणेसाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेसाठी सादर...**<br><br>**टिपणी** — विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी नव्यानेच यश स्मार्ट आयडी कार्ड तयार केलेली आहेत. 5 ते 6 लाख विद्यार्थ्यांना हे कार्ड वितरित करावयाची आहेत. तसेच विद्यार्थ्यांना पाठवावयाची गुणपत्रके, प्रमाणपत्रांचीही संख्या लाखोंच्या घरात असते. या संदर्भात भारतीय डाक घर, नाशिक येथील मुख्यालयात विचारणा केली असता त्यांच्या अधिकाऱ्यांनी विद्यापीठात भेट देऊन Book-Now-Pay-Later या सेवेसंदर्भात प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार ही सेवा अत्यंत कार्यक्षम असून अचूकतेची ग्वाही दिलेली आहे. तसेच त्यांनी सादर केलेल्या दरांमध्ये वाटाघाटीअंती 30 ते 40 टक्के सवलत देण्याचीही तयारी दर्शविलेली आहे. भारत सरकारच्या डाक विभागाची ही सेवा घेण्यासाठी भारतीय डाक विभागाशी सामंजस्य करार करणे आवश्यक आहे. हा करार करण्यासाठी मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : सेवासुविधा कक्षाने प्रस्तावित केलेला भारतीय डाक विभाग यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या टपाल सेवेच्या प्रस्तावाला व डाक विभागासोबत करारपत्र करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| 205.4 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय** |
| | 205.4.1 आस्थापना कक्ष | **महाराष्ट्र शासन राजपत्र व सामान्य प्रशासन विभागाची दिनांक 6 जून 2017ची अधिसूचना प्रस्तुत विद्यापीठास लागू करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेसाठी सादर...**<br><br>**टिपणी** – महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दि. 6 जून 2017 रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेन्वये लिपिक/टंकलेखक गट क या पदावरील सेवा प्रवेशाच्या तरतुदी विद्यापीठाला लागू करण्याविषयीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दि. 6 जून 2017 रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेन्वये लिपिक/टंकलेखक गट क या पदावरील सेवा प्रवेशाच्या तरतुदी विद्यापीठाला लागू करण्याविषयीचा शासन निर्णय जरी 2017 पासून लागू असला तरी विद्यापीठात याची अंमलबजावणी तेव्हापासून न करता इथून पुढे नव्याने करण्यात येणाऱ्या नियुक्तीपासून लागू करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 205.4.2 कुसुमाग्रज अध्यासन | **विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने 'अनुवाद' पुरस्कार प्रदान करण्यात येण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेसाठी सादर...**<br><br>**टिपणी** – मराठी भाषा अधिकाधिक अभिव्यक्तीक्षम व्हावी यासाठी भारतीय भाषांतील (इंग्रजीसह) कृती मराठी भाषेत भाषांतरित व्हाव्यात म्हणून उत्तेजन देण्यासाठी विद्यापीठातील कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने रुपये 21,000/- इतक्या रकमेच्या 'अनुवाद' पुरस्काराचे वितरण 2026 पासून दरवर्षी करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br><br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – कुसुमाग्रज अध्यासनाद्वारे प्रस्तावित पुरस्कार स्तुत्य असून हा पुरस्कार प्रदान करण्यास सर्वानुमते तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली. मात्र या पुरस्काराचे स्वरूप व नियमावली तयार करून सदर नियमावली मा. व्यवस्थापन मंडळाच्या पुढील सभेत सादर करण्यात यावी अशीही सुचना करण्यात आली. |
| | | मा. अध्यक्षांच्या मान्यतेने सभा समाप्त करण्यात आली. |

**कुलगुरू तथा अध्यक्ष,**
**मा. व्यवस्थापन मंडळ**

**कुलसचिव तथा सचिव,**
**मा. व्यवस्थापन मंडळ**